**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचा सोहळा देशभरात साजरा होणार.**
2. **नागरी सुविधांना चालना देण्याकरता नागपूरसाठी ३१५ कोटींचा विकास निधी मंजूर झाल्याची पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.**
3. **मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा महाएल्गार आंदोलनाला पाठिंबा, बच्चू कडू आज मुंबईत मुख्यमंत्र्यांची घेणार भेट.**
4. **दादासाहेब गवई स्मारकाचं सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते अमरावतीत लोकार्पण.**

-------------------------------------------

राष्ट्रीय एकता दिन

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त गुजरातमधील केवडिया इथं उद्या एक भारत, श्रेष्ठ भारतचे प्रतीक असलेली भव्य एकता परेड आयोजित करण्यात येणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पाटणा इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सरदार पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्तची परेड नवी दिल्लीतील प्रजासत्ताक दिन सोहळ्याच्या परेडच्या धर्तीवर असेल, असं शहा यांनी सांगितलं. केंद्रीय सशस्त्र निमलष्करी दलांव्यतिरिक्त, राज्यांचे पोलिस दल आणि देशभरातील कलाकार या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. तसंच सरदार पटेल आणि बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान गुजरातमधील एकता नगरमध्ये भारत पर्व साजरं करण्यात येणार असल्याची माहिती शहा यांनी दिली.

***(होल्ड बाईट - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा)***

***रन फॉर यूनिटी को बड़े स्तर पर आयोजित करने का निर्णय लिया गया है। देश के सभी राज्य केंद्र शासित प्रदेश जिला पुलिस स्टेशन, सभी स्कूल्स और यूनिवर्सिटी में रन फॉर यूनिटी का आयोजन हुआ है। उसके बाद देश का प्रत्येक नागरिक देश की एकता और अखंडता के लिए शपथ लेने का भी कार्यक्रम आयोजित किया गया है।***

-----------------------------------------

मंत्री मनसुख मांडवीय

जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारताने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. ते आज मुंबईत भारत नौवहन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. अमृतकाळात नौवहन क्षेत्रातल्या भारतीय पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करुन घेतला पाहिजे असं आवाहन त्यांनी केलं.

-----------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी राज्य सरकारने नागपूर महानगरपालिकेस तब्बल ३१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून रस्ते, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, स्वच्छता, उद्याने आणि प्रकाश व्यवस्था यांसारख्या पायाभूत सुविधांच्या उभारणीस गती मिळणार आहे. महापालिकेने तयार केलेल्या विकास आराखड्याला मंजुरी देत शासनाने हा निर्णय घेतला असून नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात निविदा प्रक्रिया सुरू होणार आहे, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.  या निधीतून पूर्व आणि  उत्तर नागपूरमधील पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील असं त्यांनी सांगितलं.

-----------------------------------------

बच्चू कडू

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज नागपूर इथं प्रहार पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांच्या नेतृत्वात होत असलेल्या आंदोलन स्थळी भेट दिली. आपण एक शेतकरी म्हणून इथं आलो असून बच्चू कडू यांच्या आंदोलनाला आपला पूर्ण पाठिंबा आहे, असं जरांगे यांनी सांगितलं. सर्व स्तरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, शेत पिकं खरडून गेली आहेत, जनावरं आणि अन्य पशुधनाची देखील मोठी हानी झाली आहे.  अश्यात संपूर्ण कर्ज माफी आवश्यक असल्याचं मत  जरांगे पाटील यांनी व्यक्त केलं असून  हे आंदोलन यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त केला -

(***होल्ड बाईट - जरांगे- २६ सेकंद)***

***शेतकर्यांना आपल्या न्याय कसा मिळेल त्याच्या पदरात काय पडेल यासाठीचं आपल्याला सगळ्यांना एकजनाणं  ताकद देणं गरजेचं आहे. त्या***

***पद्धतीने आम्ही सगळे राज्यातले शेतकरी एकजनाणं आहोत आंदोलनाच्या पाठीशी सगळा संसार शेतकऱ्यांचा उद्ध्वस्त झाला. भरपाई देते काय आम्हाला 100 टक्के भरपाई पाहिजे या मतावरती आहे . त्यामुळे मोठेपण लहानपण नाही पण का नाही श्रीमंत शेतकरी, गरीब शेतकरी सगळे एका आचारसंहीता खाली जर खाली आले तर हे आंदोलन सुरू होते आणि सगळ्यांना बाहेर पडावंचं लागनं आहे.***

दरम्यान, आज मुंबईत मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाल्यानंतर आपली पुढची भूमिका जाहीर करू, असं कडू यांनी स्पष्ट केलं. आंदोलक सध्या बुट्टीबोरीत ठिय्या देऊन आहेत.

-------------------------------------------

फिल्म बाजार

गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील “फिल्म बाजार” विभागासाठी राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळामार्फत दरवर्षी मराठी चित्रपट पाठविण्यात येतात. यंदा “फिल्म बाजार -२०२५” करिता "मुक्काम पोस्ट देवाचं घर" या मराठी चित्रपटाची निवड करण्यात आल्याची घोषणा महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी केली आहे. कीमाया प्रॉडक्शनचे महेश कुमार जायसवाल, किर्ती जायसवाल यांनी "मुक्काम पोस्ट देवाचं घर" या चित्रपटाची निर्मिती केली असून संकेत माने यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे." या चित्रपटात ग्रामीण भागातली गोष्ट मांडण्यात आली आहे.

-------------------------------------------

निवडणूक हेल्पलाईन

निवडणूकीसंदर्भात नागरिकांच्या शंका आणि तक्रारींचं निराकरण करण्यासाठी निवडणूक आयोगानं राष्ट्रीय तसंच राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय हेल्पलाइन सक्रिय केल्या आहेत. राष्ट्रीय संपर्क केंद्र सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी केंद्रीय हेल्पलाइन म्हणून काम करेल. ते दररोज सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत १८००-११-१९५० या टोल-फ्री क्रमांकाद्वारे कार्यरत राहणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

-------------------------------------------

दादासाहेब गवई

अमरावती जिल्ह्यात अमरावती-मार्डी रस्ता इथं दिवंगत नेते रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई स्मारकाचं लोकार्पण सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भुषण गवई यांच्या  हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थतीत संपन्न झालं.   यावेळी उपमुख्यमंत्री   एकनाथ   शिंदे, उपमुख्यमंत्री   अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. दादासाहेब गवई यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेल असं उत्तुंग आणि गुणवत्तापूर्ण स्मारक याठिकाणी तयार झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाधान व्यक्त केलं. दादासाहेबांचे कार्य आणि त्यांची तीस वर्षांची विधानपरिषदेची कारकीर्द तरुण पिढीपर्यंत पोहोचावी यासाठी त्यांचे  स्मारक तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. नवीनतम पद्धतीचा वापर करून या स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्यात ऑडिटोरियम, अँपी  थियेटर तयार केले जाणार आहे आणि विद्यापीठाच्या माध्यमातून नवीन पिढीला प्रेरणा घेता येऊ शकेल अशी व्यवस्था इथे लवकरच उपलब्ध होईल असं आश्वासन त्यांनी दिलं.

-------------------------------------------

गोर बंजारा

गोर बंजारा समाजाला एसटी दर्जाचे आरक्षण आणि हैदराबाद गॅझेटनुसार सेवा सवलती लागू करण्याच्या मागणीसाठी गोर बंजारा समाजाने वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर दोन तास रास्ता रोको आंदोलन केलं. पोहरागडचे महंत कबीरदास महाराज यांच्या उपस्थितीत झालेल्या या आंदोलनात वाशीम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि हिंगोली जिल्ह्यांतील सुमारे पाच हजार आंदोलक सहभागी झाले.  शासनानं  महिनाभरात मागण्या मान्य न केल्यास रेल रोको आणि आमरण उपोषणाचा इशारा आंदोलनकांतर्फे देण्यात आल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे.

-------------------------------------------

अमरावती-अजनी-अमरावती रेल्वे

प्रवाशांच्या सोयीसाठी अमरावती-अजनी-अमरावती एक्सप्रेसमधील आरक्षित कोचची सुविधा आणखी तीन महिन्यांसाठी वाढविण्यात आली आहे. ही सुविधा १ नोव्हेंबर  पासून उपलब्ध होणार असून, गाडीमध्ये २ स्लीपर, १ एसी ३-टियर इकॉनॉमी आणि १ चेअर कार कोचचा समावेश असेल. या कोचसाठी आरक्षणाची सुविधा ३१ ऑक्टोबरपासून सर्व पीआरएस केंद्रांवर आणि आयआरसीटीसी संकेत स्थळावर वर सुरू होईल.

-------------------------------------------

मूक मोर्चा

फलटण इथल्या  महिला वैद्यकीय अधिकारी आत्महत्या प्रकरणाची चौकशी एसआयटीमार्फत करण्यात यावी आणि खटला जलदगती न्यायालयात चालवून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी विविध डॉक्टर्स संघटना आणि  सामाजिक संस्थांच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात आला. जिल्हा परिषद कार्यालयापासून सुरू झालेल्या या मोर्चाचा समारोप जिल्हा कचेरीवर झाल, त्यानंतर मागण्यांचं  निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आलं.

-------------------------------------------

जबलपूर अपघात

जबलपूर महामार्गावर आज दुपारी झालेल्या भीषण अपघातात तीन जन मृत्युमुखी तर दहा जण जखमी झाल्याचं वृत्त आहे. नागपूरहुन जबलपूर कडे जाणारी ट्रव्हल्स आणि खाजगी कार यांच्यात हा अपघात झाला कारमधील तिघांचा जागीच मृत्यु झाला तर ट्रव्हल्समधील काही प्रवासी जखमी झाले आहेत.

-------------------------------------------

पुरग्रस्तांची मदत

राज्यातील पुरग्रस्तांच्या मदतीसाठी बुलढाणा जिल्ह्यातून मुख्यमंत्री सहायता निधीकडे मोठ्या प्रमाणावर निधी जमा होऊ लागला आहे. शेगाव इथल्या  संत श्री गजानन महाराज संस्थानने आधीच १ कोटी ११ लाख रुपये निधी दिला आहे. आता खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने ५१ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीस दिला आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकरी आणि  नागरिकांचे मोठे नुकसान झाल्याने मदतीचा ओघ सुरू असून विविध संस्था, कर्मचारी संघटना आणि नागरिकही पुढे सरसावले आहेत.

-------------------------------------------

आयसीसी महिला क्रिकेट

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामना सुरु आहे. नवी मुंबईत डॉ.डी.वाय. पाटील स्टेडियमवर होत असलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं  नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा

ऑस्ट्रेलियाच्या 40 षटकांत 5 गडी बाद 254 धावा झाल्या होत्या. दरम्यान, काल रात्री गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं इंग्लंडवर १२५ धावांनी विजय मिळवत, अंतिम फेरी गाठली आहे.

-------------------------------------------

हवामान

विदर्भातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आज पहाटेपासून नागपुरात हलक्या ते मध्यम स्वरूपाची पर्जन्यवृष्टी झाली. उद्या देखील अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान मोंथा चक्रीवादळाचा जोर आता कमी झाला आहे तरीही राज्याच्या सोलापूर, पुणे, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाल्याचं वृत्त आहे.

-------------------------------------------